# - अनुक्रमणिका -


| अ.क्र. | तपशील | | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| **भूमिका** | **प्रस्तुत शोधनिबंधाची अभ्यास पद्धती** | : | 1 - 2 |
| **प्रास्ताविक** | **दलित आणि ग्रामीण कथा आणि कथाकार**<br>शंकरराव खरातांचे व्यक्तिमत्व, "सांगावा" स्वभाव रेखाटन, वामन होवाळांचे व्यक्तिमत्व, "येळकोट" स्वभाव रेखाटन, साम्यभेद. | : | 3 - 4 |
| **प्रकरण पहिले** | **पूर्वपीठिका**<br>1960 नंतरची कथा, ग्रामीण कथावाङ्मय, प्रादेशिक कथा - जीवनातील अर्थशून्यत्व विकृत मनोवृत्तीचा शोध घेणारी कथा, दलित कथा आणि कथाकार | : | 5 - 17 |
| **प्रकरण दुसरे** | **दलित कथेचे शिल्पकार : श्री शंकरराव खरात यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्व**<br>प्रास्ताविक, बारा बलुतेदार, प्रेरणा, तडीपार, गावशीव, आडगांवचं पाणी, सांगावा | : | 18 - 24 |
| **प्रकरण तिसरे** | **शंकरराव खरातांच्या "सांगावा" कथासंग्रहातील स्वभावरेखाटने**<br>ग्रामीण मातीतील कथा, उपेक्षितांचे चित्रण, हृदयाला पाझर फोडणारी चित्रणे, अंधश्रद्धाळू माणसे, स्पृश्य-अस्पृश्य भेद, पिचला जाणारा व पिचवणारा यांचा संघर्ष, नियतीपेक्षा माणसाला महत्व, उदात्त आणि अनुदात्ताचे चित्रण, पद्दलित माणसांच्या व्यथा-वेदना, रेखीव व सजीव चित्रणे, स्त्री-व्यक्तिचित्रणे, वेशीच्या आतील आणि बाहेरील माणसांचे चित्रण, आत्मानुभूतीतून घडलेली पात्रे. | : | 25 - 41 |

| अ.क्र. | तपशील | | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| प्रकरण चौथे | **वामन होवाळ यांचे वाङ.मयीन व्यक्तिमत्व**<br>ग्रामीण कथा, कथनशैली, विनोदी शैली, भाषा शैली, पात्र चित्रण, कथा संग्रहांचा परिचय, बेनवाड, वारसदार, वाटा-आडवाटा. | : | 42 - 49 |
| प्रकरण पाचवे | **वामन होवाळांच्या "येळकोट" कथासंग्रहातील स्वभाव रेखाटने**<br>बदमाश, भ्रष्टाचारी, बेरकी, टगी-टोणगी, धूर्त, इरसाल, भोळी-दुबळी, कणखर, इमानी-अंधश्रद्धाळू, परंपरावादी, उत्साही, परिवर्तनवादी, वामन होवाळांच्या कथांचा केंद्रबिंदू, विशिष्ट प्रवृत्ती : जात नव्हे. | : | 50 - 63 |
| प्रकरण सहावे | **शंकरराव खरात व वामन होवाळ यांच्या कथालेखनातील साम्य-भेद**<br>कथा लेखनाची पार्श्वभूमी, प्रेरणा, कथेची सुरवात आणि शेवट, पात्रांची नांवे, देव अंधश्रद्धा, व्यक्तिचित्रणे, स्त्री-व्यक्तिरेखा, भाषाशैली. | : | 64 - 80 |
| प्रकरण सातवे | **उपसंहार**<br>सर्व प्रकरणांचा साकल्याने विचार, खरातांची कथा, वामन होवाळांची कथा, व्यक्तिचित्रणे, साम्य व भेद, होवाळांचे वेगळेपण. | : | 81 - 85 |
| परिशिष्ट | **1) शंकरराव खरातांचा परिचय** | : | 88 - 88 |
| | **2) वामन होवाळांचा परिचय** | : | 89 - 90 |
| | **3) वामन होवाळांची मुलाखत** | : | 91 - 95 |
| | **4) वामन होवाळांचे हस्ताक्षर** | : | 96 |
| | **5) संदर्भ ग्रंथ सूची** | : | 97 - 98 |

I

## - भू मि का -

'शंकरराव खरात व वामन होवाळ यांच्या कथा लेखनाचा तुलनात्मक अभ्यास' ('सांगावा' व 'येळकोट' या कथा संग्रहाच्या आधारे) हा विषय एम्.फिल.च्या शोध प्रबंधासाठी निवडण्यामागे मराठी विभाग (शिवाजी विद्यापीठ) तसेच मार्गदर्शक डॉ. कन्हैया कुंदप यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करून विषय निश्चित केला गेला.

कडेपूरला कॉलेजमध्ये शिकत असताना 1986 साली तिथं वामन होवाळांचे कथा-कथन झालेलं तेव्हा त्याने भारावून जाऊन त्यावेळी "येळकोट" हा कथासंग्रह वाचलेला. याशिवाय शंकरराव खरात हे ही माझ्या परिसरातील, जवळचे कथाकार. त्यांचाही 'सांगावा' कथासंग्रह वाचलेला होता. या दोन्ही कथासंग्रहातील माणसं माझ्या परिसरातील होती. त्या पात्राविषयी मनात जिव्हाळा निर्माण झाला. 'येळकोट' मधील 'अब्रु' कथेत माझ्या गावचेच वर्णन आले आहे. त्यावेळी यावर कधीतरी लिहावं असा विचार करीत होतो. आणि अभ्यासपूर्ण लिहिण्याची ही एम्.फिल. मुळे संधी मिळाली. मी हे दोन्ही कथासंग्रह निवडले. मार्गदर्शक डॉ. कन्हैया कुंदप यांच्या सल्ल्यावरून दोन्ही कथासंग्रहांचा तुलनात्मक अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केला आहे.

मराठी कथेची, दलित कथेची पूर्वपीठिका, थोडक्यात सांगण्याचा प्रयत्न केला आहे. शंकरराव खरातांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्व, विस्ताराने सांगितले आहे. त्याचबरोबर "सांगावा" कथा संग्रहातील स्वभाव रेखाटने आणि वामन होवाळांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्व, 'येळकोट' कथासंग्रहातील स्वभावरेखाटने यांचाही सविस्तर अभ्यास केलेला आहे.

शंकरराव खरात व वामन होवाळ यांच्या 'सांगावा' व 'येळकोट' या कथा संग्रहाच्या आधारे कथा लेखनातील साम्य व भेद यांची माझ्या परीने मी तुलना केलेली आहे. शोध प्रबंधातील विवेचन, तुलना सर्वमान्य होईलच असे नाही. मात्र या ठिकाणी एका निखळ संशोधकाच्या भूमिकेतुन 'शंकरराव खरात व

वामन होवाळ यांच्या कथा लेखनाचा तुलनात्मक अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केला आहे.
परिशिष्ठामध्ये वामन होवाळ यांची मुलाखत समाविष्ट केलेली आहे.

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करताना विषयाची निवड करण्यापासून ते प्रबंधाला पूर्णत्व देण्यापर्यंत माझे आदरणीय व माननीय मार्गदर्शक डॉ. कन्हैया बाबुराव कुंदप, प्रपाठक व मराठी विभाग प्रमुख सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड यांनी केलेल्या मौलीक मार्गदर्शनामुळे स्वतः घेतलेल्या कष्टामुळे, सहकार्यामुळे व वेळोवेळी प्रबंध पूर्ण करण्यासाठी दिलेल्या प्रेरणामुळे हा प्रबंध पूर्ण होऊ शकला. त्यांचा सदैव ऋणी राहणे हे मी माझे सद्‌भाग्यच समजतो.

शोधनिबंधाचा अभ्यास करताना माझे प्रिय मित्र प्रा. पी.डी. चंदनशिवे यांनी उपलब्ध करून दिलेल्या हस्तलिखिताचा, कात्रणांचा मला उपयोग झाला. त्याबद्दल त्यांचा अत्यंत आभारी आहे.

एम्‌.फिल. अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊन तो पूर्ण करण्यासाठी सहकार्य व प्रेरणा देणारे आदरणीय प्राचार्य ई.जी. निकम, महिला महाविद्यालय, उंब्रज, प्राचार्य अप्पासाहेब पानवळ, सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड, प्राचार्य आण्णासाहेब गरूड, आर्टस्‌,सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर या सर्वांचे ऋण कधीही न फिटण्यासारखे आहेत.

तसेच प्रा. सौ. सूर्यमाला जाधव, प्रा. बी.आर. बोळाज, प्रा. बी.पी. पाटील, प्रा. सौ. हेमलता आर. गायकवाड, प्रा. सौ. सरला निकम यांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाल्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी आहे.

माझे सहकारी मित्र प्रा. शिवाजीराव एम. भोसले, प्रा. नेताजी सूर्यवंशी, प्रा. मारूक मुजावर, प्रा.मिलींद पाटील, प्रा. राजाराम पाटील, प्रा. लालासाहेब जाधव, प्रा. श्रीमती सुरेखा चव्हाण, प्रा. वामन पाटील, प्रा. चंद्रकांत लंगरे, प्रा. भानुदास शिंदे, प्रा. दिलीपकुमार कसबे, श्री हैबतराव यादव, कवी प्रकाश बिराजे, श्री शामराव घाडगे, प्रा. अरूणकुमार यादव यांनी मला सतत प्रेरणा दिली

एम्‌.फिल.चा अभ्यास पूर्ण करण्यासाठी आर्थिक मदत करणारे श्री तानाजीराव महादेव पोळ (चुलते) श्री अनिल पांडुरंग पोळ (भाऊ) या दोघांचा मी सदैव ऋणी आहे.

शोध निबंधासाठी आवश्यक महत्वाची अशी संदर्भ पुस्तके मिळवून देण्यासाठी अनेकांनी सहकार्य केले. महिला महाविद्यालय उंब्रजचे ग्रंथालय, सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराडचे ग्रंथालय, छत्रपती शिवाजी कॉलेजचे ग्रंथालय, रामानंद कॉलेजचे ग्रंथालय, महात्मा गांधी विद्यालय, कडेगांवचे ग्रंथालय, कला व वाणिज्य महाविद्यालय कडेपूरचे ग्रंथालय इत्यादी ठिकाणी उपलब्ध असलेल्या संदर्भ पुस्तकांचे मला अमोल सहकार्य लाभले. त्या सर्व ग्रंथपालांच्या सहकार्याबद्दल मी कृतज्ञ आहे.

यापुढेही या सर्वांचे सहकार्य मिळावे ही आशा बाळगतो व सर्वांचा ऋणी राहू इच्छितो.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

## - प्रा स्ता वि क -

शंकरराव खरात व वामन होवाळ यांच्या कथालेखनाचा तुलनात्मक अभ्यास करताना काही गोष्टीकडे कटाक्षाने लक्ष पुरविले आहे. त्या गोष्टी अशा :-

मराठी व दलित लघुकथेच्या पायाचा विचार केला असून 1926 पासून मराठी लघुकथेचे झालेले आवर्तन याचेही विवेचन केले आहे. 1960 नंतरची कथा, ग्रामीण कथा आणि कथाकार जीवनातील अर्थशून्यवादी विकृत मनोवृत्ती, प्रादेशिक कथा यांचाही सविस्तर आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. दलित कथा आणि कथाकार यांच्या गुण दोषाबद्दलही विवेचन करण्याचा प्रयत्न मी केलेला आहे.

दलित कथेचे शिल्पकार शंकरराव खरात, त्यांच्या कथालेखनाची सुरवात, प्रेरणा त्यांच्या विविध कथासंग्रहाची वैशिष्ठये आणि त्यातून आढळणारे त्यांचे वाड.मयीन विशेष, व्यक्तिमत्व नोंदवण्याचा माझ्या परीने प्रयत्न केलेला आहे. शंकरराव खरात दलित कथाकार असूनही दलितेतर जीवनाचा वेध त्यांनी कसा घेतला आहे हे वैशिष्टयपूर्ण आहे.

"सांगावा" कथासंग्रहातील व्यक्तिचित्रणाकडे बारकाईले लक्ष पुरविले आहे. त्यात दलित आणि दलितेतरांची व्यक्तिचित्रणे, वेशीच्या आतील आणि वेशीच्या बाहेरील व्यक्तींचा शोध घेतलेला आहे. व्यक्तिंचे संवाद, भाषाशैली, स्वभाव, मानवी समुदाय दुःख यांचाही शोध घेताना आढळणा-या वैशिष्टांचा उहापोह केलेला आहे.

नवोदित दलित कथाकार वामन होवाळ आणि त्यांचे वाड.मयीन व्यक्तीमत्व नोंदवले आहे. ग्रामीण पार्श्वभूमिवर घडलेली होवाळांची कथा आणि विविध कथासंग्रहातून आढळणारे त्यांचे वाड.मयीन विशेष या सर्वांचे विवेचन केलेले आहे.

"येळकोट" मधील स्वभावरेखाटनांची वृत्ती-प्रवृत्ती यांचाही शोध हा महत्त्वाचा मानावा लागेल. बेरकी भ्रष्टाचारी, धूर्त, इरसाल, टगी-टोणगी, भोळी-दुबळी, ज्ञानी, अंधश्रद्धाळू, परंपरावादी, उत्साही, परिवर्तनवादी स्वरूपाच्या व्यक्तिंचा "येळकोट" च्या आधारे शोध घेतलेला आहे. याशिवाय माणसांची वागण्याची पद्धत, संवाद, भाषाशैली यांचाही विचार केलेला आहे. तसेच वामन होवाळ हे दलितेतर कथा लेखक असूनही त्यांनी दलितांच्या व्यथा वेदनांचे चित्रण प्रवृत्तीचे चित्रण म्हणून कसे केले आहे ते पाहण्यासारखे आहे.

शंकरराव खरात व वामन होवाळ यांच्या कथालेखनातील साम्य-भेद प्रामुख्याने कथालेखनाची सुरवात कशी झाली, कथालेखनाकडे कसे वळले, त्यांच्या प्रेरणा, नायक, व्यक्तिचित्रणे, स्त्री यांची स्वभावरेखाटने, अंधश्रद्धा, कथेतलं खेड, शीर्षक, संवाद, भाषाशैली, होवाळांच्या कथेतुन मिळणारी समाजशास्त्रीय माहिती या सर्वांचा तुलनात्मक विचार करण्याचा प्रयत्न माझ्या परीने केलेला आहे. तो सर्वमान्य होईलच असे नाही.

परिशिष्ठामध्ये शंकरराव खरातांचा परिचय, त्यांना मिळालेले पुरस्कार, वामन होवाळांचा परिचय, त्यांना मिळालेले पुरस्कार, वामन होवाळांचे हस्ताक्षर, मुलाखत या बाबी नोंदवल्या आहेत.

प्रबंधाच्या शेवटी संदर्भग्रंथाची सूची दिलेली आहे. वरीलप्रमाणे शोधनिबंधात परिपूर्णता आणण्याचा मी कसोशीने प्रयत्न केला आहे.

- - - -